**नि.फौ.ख.क्र. १५८/२०२१**

**सरकार –वि– शांताराम धोंगडे**

**निशाणी क्र. ५६**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची शपथेवर जबानी.**

नांव – उषा रविंद्र तातळे

वय – ३५

धंदा – मजूरी

राहणार – जांबुटके, ता. चांदवड, जि. नाशिक

<u>**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. एन. पी. मोरे सहा. सरकारी अभियोक्ता**</u>

१. दि.१०.०८.२०२१ रोजी आमचे शेजारी बायटाबाई कोरडे यांच्या घरामध्ये साप निघाला होता. तेव्हा माझी आई माझा भाऊ गोरख नारायण भांगरेला म्हणाली की, तो कोणाता साप आहे, तु धरायला जाऊ नकोस. आ.क्र. १ व २ ने माझ्या आईचे बोलणे अंगावर ओढून घेतले व माझ्या आईला सुंदराबाईला काठीने मांडीवर व कमरेवर मारहाण केली. तिला माझा भाऊ पो.स्टेशनला घेऊन गेला. आरोपींनी माझ्या आईला दि.१४.०८.२०२१ रोजी सकाळी ११:०० ते १२:०० च्या दरम्यान मारहाण केली होती.

२. माझ्या आईला आ.क्र. १ व २ ने मारहाण केली तेव्हा तेथे आरोपी क्र. ३ हजर होती. आ.क्र. ३ ने माझ्या आईला लाथाबुक्यांनी मारहाण केली होती. आरोपींनी ज्या काठीने माझ्या आईला मारहाण केली होती ते दाखवल्यास मी ओळखू शकते. मला आता आर्टीकल ए कडील काठी दाखवली. ती तीच आहे. मी आरोपींना ओळखते. आज न्यायालयात आ.क्र. १ ते ३ हजर आहेत. आ.क्र. ४ च्या गैरहजेरीचा अर्ज आरोपीच्या विधिज्ञांनी दिलेला असून तो अर्ज आरोपींची ओळख आव्हानित करणार नाही या अटीवर मंजूर करण्यात आला.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. व्ही. ए. घुले यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

३. फिर्यादी माझी आई आहे. माझे लग्न होऊन १६ वर्ष झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासर चाळीसगाव तालुक्यातील सिंदोळे गाव आहे. मला चार मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी साधारणतः ८ ते ९ वर्षांपासून माझ्या माहेरी मुलांसह आईकडेच राहते. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या आईपासून विभक्त राहते.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने मला टाकून दुसरे लग्न केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जांबुटके गावामध्ये रोजंदारीने कामाला जाते. हे म्हणणे खरे आहे की, मी उक्त्यामध्ये देखील काम घेते. हे म्हणणे खरे आहे की, उक्त्यामध्ये काम करण्यासाठी ५ ते १० लोकांची टोळी असते त्यामध्ये आम्ही काम करतो.

५. हे म्हणणे खरे आहे की, आ.क्र. २, ३ व ४ हे देखील आमच्या टोळीमध्ये काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत उक्त्यामध्ये त्यांच्या टोळीसोबत कामाला जाऊ नको असे माझ्या आईचे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या कारणावरुन माझे व आईचे वाद होत असल्यामुळे आईने मला वेगळे काढून दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझ्या आईचे एकमेकांसोबत पटत नाही, आमचे नेहमी वाद होतात.

६. मला चार बहिणी आहेत व दोन भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील व माझी आई साधारणतः २५ वर्षांपासून वेगळे राहतात. माझा भाऊ विठ्ठल हा माझ्या वडीलांसोबत राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ विठ्ठलच माझ्या वडीलांचा सांभाळ करतो, माझी आई माझ्या वडीलांकडे पाहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील माझ्या आईच्या घराच्या पश्चिमेला साधारणतः १ किमी अंतरावर वेगळे घर करुन राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे व माझ्या आईचे घर समोरासमोर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही जांबुटके–एकरुखे रस्त्यालगत राहतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याने नेहमी माणसांची वर्दळ चालू असते.

७. मी एकरुखे येथील कैलास बाजीराव धनाईतला ओळखते. एकरुखे ते जांबुटके अंतर ३ किमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.१४.०८.२०२१ रोजी मी कैलास धनाईत यांच्या शेतामध्ये सकाळी ८ः०० वाजता कांदे

लावण्यासाठी गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमची कामावरुन सुट्टी संध्याकाळी ६:०० वाजता होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेदिवशी त्यामुळे मी संध्याकाळी ७ ते ७:३० ला घरी आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरची घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर माझ्या ऐकीव माहितीच्या आधारे सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी आरोपी क्र. १ व २ ने काठीने माझ्या आईला मारहाण केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आ.क्र. ३ ने माझ्या आईला लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण केल्याचे मी खोटे कथन केले आहे.

९. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई शेळ्या चारवण्याचे काम करते. माझ्या आईकडे ७ ते ८ शेळ्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शेळ्या चारण्यासाठी काठी लागते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल ए कडील काठी माझ्या आईची शेळ्या वळण्याची काठी आहे. मी राधाबाई कावळेला ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, राधाबाई माझ्या आईच्या घराच्या दक्षिणेला खोलगट भागामध्ये राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझे व माझ्या आईचे घर टेकडीवर उंच भागावर शाळेजवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, राधाबाई कावळे शेतात राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईचे घर ते राधाबाईचे घर साधारणतः १ किमीचे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, राधाबाईचे शेत २ ते ४ वर्षांपासून माझ्या आईने गहाण ठेवलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझ्या आईचे व राधाबाईचे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझी आई असल्यामुळे तिला मदत करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.04.01 13:59:10 +0530

**दि. ०१.०४.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**

**नि.फौ.ख.क्र. १५८/२०२१**

**सरकार –वि– शांताराम धोंगडे**

**निशाणी क्र. ५७**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ ची शपथेवर जबानी.**

नांव – राधाबाई पांडूरंग कावळे

वय – ४५

धंदा – मजूरी

राहणार – जांबुटके, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. एन. पी. मोरे सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.१४.०८.२०२१ रोजी मी फिर्यादीच्या घरी गेले होते. तेव्हा आ.क्र. १ ने फिर्यादीला काठीने दोन्ही मांड्यावर मारले होते. आ.क्र. १ फिर्यादीला मारत होता हे मी स्वतः पाहिलेले आहे. आ.क्र. १ ने ज्या बांबूने फिर्यादीला मारले होते. तो बांबू दाखवल्यास मी ओळखू शकते. मला आर्टीकल ए कडील दाखवलेला बांबू तोच आहे. मी आ.क्र. १ ला ओळखते. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. व्ही. ए. घुले यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, काठी व बांबूमध्ये फरक असतो. हे म्हणणे खरे आहे की, मला जी आर्टीकल ए कडील वस्तु दाखवली. तो बांबू नसून काठी आहे. हे म्हणणे खरे आहे की, बांबू पोकळ व जाड असतो.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी आज न्यायालयात फिर्यादीसोबत आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आज न्यायालयात फिर्यादीच्या सांगण्यानुसार साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे शेत फिर्यादीच्या घराच्या दक्षिणेला खोलगट भागात आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर शेतात आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरातून फिर्यादीचे घर उंचवट्यावर असल्यामुळे दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई फिर्यादीच्या घराजवळ राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे

फिर्यादीसोबत पैश्याचे देण्या–घेण्याचे व्यवहार चालतात. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे शेत ५ ते ६ वर्षांपासून फिर्यादीकडे गहाण ठेवलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आजही माझे शेत फिर्यादीच गहाण म्हणून करते.

४. जितेंद्र माझा मुलगा आहे व तो माझ्यापासून विभक्त राहतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व तिच्या पतीचे पटत नसल्यामुळे ते ३० वर्षांपासून विभक्त राहतात. फिर्यादी व तिची मुलगी उषाबाईचे किरकोळ कारणावरुन नेहमी वाद होत असतात किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीची मुलगी उषाबाई व फिर्यादी विभक्त राहतात. हे म्हणणे खरे आहे की, उषाबाई आ.क्र. २ ते ४ सोबत उक्त्यामध्ये कामाला एकत्र जाते. आ.क्र. २ ते ४ च्या सांगण्यावरुन उषाबाई फिर्यादीसोबत भांडण करते असे फिर्यादीचे म्हणणे आहे किंवा कसे ते मला सांगता येणार नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीसोबत माझे चांगले संबंध आहेत. तिने मला मुलगी मानलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने फिर्यादीला बांबूने मारहाण केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे फिर्यादीसोबत चांगले संबंध असल्यामुळे तिच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नसतांना फिर्यादीला मदत करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.04.01 13:59:20 +0530

**दि. ०१.०४.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**